# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत )

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/ E55103 दिनांक : 26.11.2021

## परिपत्रक

**विषयः- सूक्ष्म व लघू उद्योजकांसाठी MSME प्रवर्गातंर्गत प्राधान्याने भूखंडाचे वाटप करणेबाबत.... अट क्र. ११ मध्ये सुधारणा करणेबाबत**

**संदर्भ :- १. जा.क्र. मऔविम/भूविभाग/कार्या-१/एप५२३४ दिनांक ०१.०३.२०१९**
**२.जा.क्र. मऔविम/भूविभाग/कार्या-१/सीद६७५६ दिनांक १३.०८.२०१९**

महामंडळाने सूक्ष्म व लघू उद्योजकांना प्रोत्साहन देण्याकरीता प्राधान्याने भूखंड वाटप करण्याबाबत मा. संचालक मंडळाच्या दिनांक ११.०२.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून पारीत ठराव क्र ५८७३ नुसार सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गटास भूखंड वाटप करण्याबाबत महामंडळाने दिनांक ०१.०३.२०१९ च्या परिपत्रकान्वये धोरण निर्गमित केलेले आहे. सदरहू धोरणामध्ये संचालक मंडळाच्या दिनांक २९.०७.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील पारीत ठराव क्र. ५९४० नुसार सुधारणा करण्यात आलेली आहे.

उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र. १ मधील अ.क्र. ११ नुसार सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गटांना वाटप केलेला भूखंड हा प्राथमिक करारनामा किंवा ताबा दिनांकापासून(जे आधि असेल ते) पुढील १० वर्षे हस्तांतरण करता येणार नाही. तथापि अपवादात्मक परिस्थितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मंजूरीचे १०० टक्के फरकाची रक्कम वसूल करुन हस्तांतरण करणेबाबत निर्णय घेण्यात यावा असे धोरण निर्गमित करण्यात आले होते.

प्रकरणी लोकप्रतिनिधीकडे उद्योजकांची प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू अट शिथिल करण्यात यावी. महामंडळाच्या नियमित हस्तांतरण मार्गदर्शक तत्वानुसार हस्तांतरणास परवानगी देण्यात यावी असे निवेदन प्राप्त झाले होते सदरहू प्राप्त निवेदनानुसार, सदरहू प्रस्ताव संचालक मंडळाच्या दिनांक ०९.०८.२०२१ रोजी झालेल्या ३९० व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्र. ६३२५ पारीत करण्यात आला.

प्रकरणी महामंडळाचे उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय परिपत्रक क्र. १ व २ रद्द करण्यात येवून महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीतील पारीत ठराव क्र. ६३२५ नुसार सुधारणा करुन सूक्ष्म

व लघू उद्योजकांच्या सामूहिक गटास प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबत एकत्रित धोरण खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

१. केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु उपक्रम औद्योगिक समूह विकास योजना(MSE-CDP) अंतर्गत राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेल्या औद्योगिक समूहांना प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात यावे. भूखंड प्राप्त झाल्यानंतर सदर समूहाने केंद्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

२. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गटाच्या प्रत्येक सभासदास २०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्र वाटप करता येणार नाही

३. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गटाची प्रकल्पामधील गुंतवणूक किमान रु. १०० कोटी असणे आवश्यक आहे.

४. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गटाकरीता प्राधान्य सदराखाली जागा वाटप करण्याचे अधिकार मुख्यालयीन भू-वाटप समितीस(LAC) राहील.

५. तांत्रिक सल्लागार यांनी औद्योगिक समूहाच्या मंजूरीची तपासणी करुन अभिप्राय देण्यात यावेत.

६. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गट यांना भूखंड वाटप करते समयी सहा महिन्यांचा आत बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक असल्याची अट वाटप पत्रात तसेच प्राथमिक करारनाम्यात नमूद करण्यात यावी.

७. प्राथमिक करारनाम्यामध्ये दोन वर्ष भूखंड विकास कालावधी बाबतची तरतूद नमूद करण्यात यावी.

८. भूखंड वाटप करत असताना अ आणि ब औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपा दरम्यान Jt SPV स्थापन करणेच्या अटीवर तसेच प्राप्त अर्जदारांचे प्रकल्प अहवाल तपासून भूखंड वाटप करण्यात यावे.

९. सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गटास इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादनात जाणे क्रमप्राप्त राहील अशा इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादनात गेलेल्या सूक्ष्म व लघु उद्योजकांच्या सामुहिक गटास प्राथमिक करारनामा किंवा ताबा दिनांकापासून(जे आधि असेल ते) ५ वर्षानंतर भूखंडाचे हस्तांतरण करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१०. ज्या प्रयोजनासाठी भूखंड वाटप करणेत आला आहे, त्याच प्रयोजनासाठीच वापर करणे बंधनकारक राहील.

११. क, ड व ड+ वर्गामधे मोडणा-या औद्योगिक क्षेत्रामध्ये शासन मान्य Cluster/उद्योग समूह तथा तत्सम उद्योगाकरीता महामंडळाचे दिनांक ११.०१.२०१९ च्या धोरणाप्रमाणे भूखंड वाटपामध्ये प्राधान्य देण्यात यावे.

१२. प्राधान्य क्रमाने वाटप करण्यात येणा-या भूखंडासाठी ज्या अटी व शर्ती लागू आहेत त्या अटी व शर्ती सदर भूखंड वाटपास लागू राहतील.

१३. सदरचे धोरण हे महामंडळाच्या अ आणि ब प्रभागाकरीता लागू राहील

१४. उपरोक्त प्रमाणे भूखंड वाटप करण्यात आल्यानंतर मुदतवाढ, हस्तांतरण, पोटभाडे, सबलील इत्यादिकरीता महामंडळाचे प्रचलित धोरण लागू राहील.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(अजित पाटील)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई